## निशाणी क्र.२७ वर आदेश

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे, दावा मिळकतींचे वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळण्यासाठी दावा दाखल करण्यात आला. दावा कलम १अ मध्ये सर्व्हे क्र.३९/४ चे क्षेत्र ०.०१ आर आहे त्याऐवजी क्षेत्र ०.०१ आर + ०.०३ आर खराबा व सर्व्हे क्र.७८/१ चे एकूण क्षेत्रापैकी पुर्वेकडील १ हे १३ आर प्रतिवादी क्र.१ च्या नावे दर्शविण्यात आले असून त्याऐवजी २ हे १६ आर + ०.०३ आर खराबा पैकी प्रतिवादी क्र.१ चे क्षेत्र तसेच इतर त्रयस्थ इसमांचे क्षेत्र आहे. सर्व्हे क्र.७८/१४ चे क्षेत्रात विहीरपड असून वादींचे पुर्वज बजाबा व प्रतिवादी क्र.१ च्या नावे प्रत्येकी १ आणे ४ पैसे हक्कसंबंध आहे. सदर मिळकतीचे ७/१२ अभिलेखाला इतर त्रयस्थ इसमांचे नाव असून त्यांची नावे सामील करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे, त्यामुळे तशी दुरुस्ती वादपत्रामध्ये करणे गरजेचे आहे.

प्रतिवादी क्र.१२ – बाळकृष्ण पंढरीनाथ पवार, वय – ७० वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र.१३ – शंकर देवबा पवार, वय – ७२ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र.१४ – शिवराम देवबा पवार, वय – ६८ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र.१५ – सिताराम देवबा पवार, वय – ६५ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र.१६ – शिवनाथ कारभारी पवार, वय – ७१ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र.१२ ते १६ रा. मंगळापुर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर,

०३. वादी पुढे असे कथन करतो की, प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असल्याकारणाने त्यामध्ये तांत्रीक अडचण राहु नये म्हणुन उपरोक्त नमूद त्रयस्थ इसमांना प्रतिवादी क्र.१२ ते १६ म्हणून सामील करुन घेणेस परवानगी मिळावी. त्यांना दाव्यामध्ये सामील केल्याने दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर ७/१२ सदरी लहानु तुकाराम पवार व नामदेव लहानु पवार यांची देखील नावे आहेत परंतु ते मयत आहेत. सबब मागणी प्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०४.   वादीच्या सदर अर्जास प्रतिवादींनी **नि.क्र.२९** वर म्हणणे दाखल करुन सक्त हरकत नोंदविली आहे.  प्रतिवादी त्यांचे म्हणणेमध्ये असे कथन करतात की, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये पुर्वीच वाटप झालेले आहे. सर्व्हे क्र.३९/४ चे क्षेत्र वादी व प्रतिवादींचे हिश्याप्रमाणे बरोबर असल्याने इतर हिस्सेदारांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्याची आवश्यकता नाही. सर्व्हे क्र.७८/१ मध्ये ७/१२ उताऱ्याला हिस्सेवारीप्रमाणे प्रत्येक हिस्सेदाराचे क्षेत्र स्वतंत्र नोंद असल्याने सदरचे क्षेत्र विभागणीसाठी दुरुस्ती करता येणार नाही. सर्व्हे क्र.७८/१४ मध्ये विहीरपड ही मिळकत दाव्यात सामील असून त्यात आणेवारी प्रमाणे इतर प्रतिवादींचा हिस्सा ७/१२ उताऱ्यामध्ये वेगळा नमूद असून त्यांचे क्षेत्राशी वादीचा काही संबंध नाही त्यामुळे प्रस्तावित प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांना सामील करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०५.   अर्ज व म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रे पडताळून पाहिली असता असे निदर्शनास येते की, वादीने सदरचा दावा वाटपासाठी, कब्जा मिळणेसाठी, जाहीर ठरावासाठी व निरंतर मनाई आदेशासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे, दावा कलम १अ मध्ये सर्व्हे क्र.३९/४ चे एकूण क्षेत्र ०.०१ आर + ०.०३ आर खराबा असल्याचे नमूद करणे, सर्व्हे क्र.७८/१ चे क्षेत्र २ हे १६ आर + ०.०३ आर खराबा पैकी प्रतिवादी क्र.१ चे क्षेत्र पुर्वेकडील १ हे १३ आर असे नमूद करणे तसेच दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ इसमांची नावे ७/१२ उताऱ्यामध्ये नमूद असल्याने ते देखील या दाव्याकामी आवश्यक पक्षकार होतात, त्यांना दाव्यामध्ये सामील करणे अशा प्रकारची दुरुस्ती वादपत्रामध्ये करण्याची आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तावित प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांना दाव्यामध्ये सामील करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. कारण आणेवारी प्रमाणे इतर प्रतिवादींचा हिस्सा ७/१२ मध्ये वेगळा नमूद केला आहे. तसेच त्या क्षेत्राशी वादीचा काहीही संबंध नाही.

०६.   वादीने सदरचा दावा हा वाटपाकरिता दाखल केला आहे, त्यामुळे ७/१२ सदरी जितक्या धारकांची नावे आहेत ते या कामी आवश्यक पक्षकार होतात, त्यामुळे त्यांना सामील करणे आवश्यक आहे. वादीने मागणी केलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात व मागण्यामध्ये कोणताही बदल होत नाही. याउलट सदर दुरुस्तीमुळे दोन्ही पक्षकारामधील वादाचे समुळ उच्चाटन करणेस मदत होईल. सदर

दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे हक्कास कोणतीही बाधा येणार नाही, त्याला दुरुस्त दाव्यावर पुन्हा कैफीयत देण्याची संधी प्राप्त होणार आहे. अशा परिस्थीतीमध्ये वादीवर रक्कम रु. १५००/– खर्च लादून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे, त्याबाबतचा सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) सदरचा अर्ज रक्कम रु.१५००/– खर्च लादून मंजूर करण्यात येत आहे.

२) वादीने सदरची दुरुस्ती सदर आदेश पारीत झाल्यापासून १४ दिवसाच्या आत करणेचे आहे.

Sangita Pundlik Babar

Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2023.11.07 15:47:44 +0530

(श्रीमती एस.पी.बाबर)

दिनांक: ०७.११.२०२३.                    ३ रे सहदिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
संगमनेर